कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे

# ई-उत्तमविद्या



'A' Grade
NAAC Re-accredited
(4TH Cycle)

दि.१५ नोव्हेंबर, २०२२ मासिक पृष्ठ संख्या - १४

# आविष्कार संशोधन स्पर्धा उत्साहात

**विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धा दि. ११ व १२ नोव्हेंबर रोजी विद्यापीठात अत्यंत उत्साहात पार पडली. या स्पर्धेत ४४५ विद्यार्थ्यांनी २८८ पोस्टर व मोड्यूल्सद्वारे आपले संशोधन मांडले. या स्पर्धेचे उद्‌घाटन दि. ११ रोजी अमन मित्तल यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी होते.**

या स्पर्धेचे उद्‌घाटन करतांना जिल्हाधिकारी अमन मित्तल म्हणाले की, सध्याचे युग हे संशोधनातील नवनवीन आविष्कार आणि नाविन्यपूर्ण कल्पनांचे असून या विद्यार्थीदशेत केलेले संशोधन हे पुढील आयुष्यात दिशादर्शक ठरणारे आहे. केवळ स्पर्धेपुरते संशोधनाकडे बघू नका. संशोधनातून समाजाला विकासाच्या मार्गावर नेता येते. आपल्या अवतीभवतीच्या समस्या आणि त्यावरील उपाय शोधा असे सांगतांना श्री.मित्तल यांनी आपल्या महाविद्यालयीन जीवनातील अनुभव देखील सांगितले. अध्यक्षीय भाषणात कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांनी यापुढच्या काळात सर्जनशीलता आणि नाविन्य यांना खूप महत्व राहणार असून विद्यार्थ्यांनी त्या दृष्टीकोनातून विचार करायला हवा असे आवाहन केले. प्रास्ताविकात समन्वयक प्रा. एस.आर. कोल्हे यांनी स्पर्धेची माहिती दिली. प्रा.जी.ए.उस्मानी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. प्रा.जे.व्ही.साळी यांनी आभार मानले.



विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन अंगी बाळगून विज्ञान, कृषी, पशुसंवर्धन, वाणिज्य व व्यवस्थापन, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, सामाजिकशास्त्र, फार्मसी आदी विषयांमधील पोस्टर व मोड्युल्सची मांडणी सभागृहात केली होती. पदवी, पदव्युत्तर, पदव्युत्तर पदवी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या गटातील स्पर्धक मोठया उत्साहाने आपले संशोधन सादर केले. त्यांच्या या



संशोधनात नावीन्यता तर होतीच मात्र भविष्यातील मोठया संशोधनाची बीजे देखील दिसून येत होती.

## या संशोधन स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ दि. १२ नोव्हेंबर रोजी मोठ्या जल्लोषात झाला.

कुलगुरु प्रा.व्ही.एल. माहेश्वरी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी मंचावर प्र-कुलगुरू प्रा. एस.टी.इंगळे, प्रमुख पाहुणे म्हणून नॅचरली युवर्स बायोटेक, जळगावचे व्यवस्थापक डॉ. निलेश तेली व नोव्होटा थर्मोटेक प्रा. लि. चे व्यवस्थापकीय संचालक आर.वाय. चौधरी यांची उपस्थिती होती. याशिवाय कुलसचिव डॉ. विनोद पाटील, स्पर्धेचे समन्वयक प्रा.एस.आर.कोल्हे, उपसमन्वयक, प्रा.जे.व्ही. साळी, विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक प्रा. सुनील कुलकर्णी उपस्थित होते.



यावेळी परीक्षकांच्यावतीने बी.जे. राठी यांनी तर सहभागींच्या वतीने राकेश पाटील (धुळे), पल्लवी जाधव (नंदुरबार) यांनी मनोगत व्यक्त केले. जिल्हास्तरावर झालेल्या अविष्कार संशोधन स्पर्धेचे समन्वयक व उपसमन्वयक डॉ. भूषण कवीमंडन, डॉ. मनोज चोपडा (मु.जे.महाविद्यालय, जळगाव), डॉ. भटू बागूल, डॉ. रवींद्र पाटील (वसंतराव नाईक महाविद्यालय, शहादा), प्रा. एन.एस. पवार, डॉ. एस.के. जाधव (कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिंदखेडा), डॉ. व्ही.व्ही. गिते, डॉ.व्ही.एम. रोकडे (विद्यापीठ कॅम्पस) यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलतांना आर.वाय. चौधरी म्हणाले की, समाजाला आर्थिकदृष्ट्या परवडणाऱ्या नाविन्यपूर्ण कल्पना संशोधनाद्वारे मांडल्या जाव्यात. तर डॉ. निलेश तेली म्हणाले की संशोधनातील सर्जनशीलतेला वाव देवून नोकरी करणाऱ्यांपेक्षा नोकरी देणारे व्हा. अध्यक्षीय भाषणात प्रा. माहेश्वरी म्हणाले की, संघर्ष करत उद्योजकतेमध्ये जम बसविलेल्या व्यक्तींचे अनुभव विद्यार्थ्यांना ऐकायला मिळावेत यासाठी आपण उद्योजकांना निमंत्रीत केले आहे. प्रारंभी स्पर्धेचे समन्वयक प्रा.एस.आर.कोल्हे यांनी स्पर्धेचा आढावा सादर केला. सुत्रसंचालन डॉ.जी.ए.उस्मानी यांनी केले. डॉ अजय सुरवाडे यांनी आभार मानले.

**अविष्कार संशोधन स्पर्धेचा विविध गटांतील निकाल पुढील प्रमाणे:-**

**<u>मानव्य विद्या, भाषा, आणि ललित कला शाखा</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| **पदवी गट** | :- | मोड्यूल प्रथम | : वेष्णवी खाकरे, रंजना कुमावत (गरूड महाविद्यालय, शेंदुर्णी) |
| | | पोस्टर द्वितीय | : एकज्योत मेहता व मुस्कान जीवनानी (आर.सी.पटेल इन्स्टीट्यूट ऑफ फार्मा,शिरपूर) |
| | | पोस्टर तृतीय | : वैष्णवी नायसे व वैष्णवी जंगले (जी.जी. खडसे महाविद्यालय, मुक्ताईनगर) |
| **पदव्युत्तर गट** | :- | पोस्टर प्रथम | : राहुल पाटील (गरूड महाविद्यालय, शेंदुर्णी) |
| | | पोस्टर द्वितीय | : बंदना मिश्रा व कांचन मिश्रा (शिक्षणशास्त्र प्रशाळा, कबचौउमवि) |
| | | पोस्टर तृतीय | : सिध्देश्वर खुळे व ज्योती मुरकुटे (आर.सी.पटेल इन्स्टीट्यूट ऑफ फार्मा,शिरपूर) |
| **पदवी-पदव्युत्तर गट** | :- | पोस्टर प्रथम | : जयश्री पाटील (शिक्षणशास्त्र प्रशाळा, कबचौउमवि,जळगाव) |
| | | पोस्टर द्वितीय | : रिया जैन (गणितशास्त्र प्रशाळा, कबचौउमवि, जळगाव) |

**<u>वाणिज्य व्यवस्थापनशास्त्र व विधी शाखा</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| **पदवी गट** | :- | पोस्टर प्रथम | : कांचन कोळी व रितिका पाटील (एच.आर. पटेल इन्स्टीट्यूट ऑफ फार्मा,शिरपूर) |
| | | पोस्टर द्वितीय | : तनिष्का पटेल व अक्षय सोनवणे (व्यवस्थापनशास्त्र प्रशाळा, कबचौउमवि, जळगाव) |
| | | पोस्टर तृतीय | : वैभव भोंबे व दिपाली तायडे (कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बोदवड) |
| **पदव्युत्तर गट** | :- | पोस्टर प्रथम | : गौतम रामराजे व ऋषीकेश राजपूत (एच.आर. पटेल इन्स्टीट्यूट ऑफ फार्मा,शिरपूर) |
| | | पोस्टर द्वितीय | : आकांक्षा राजपूत व हर्षदा पाटील (व्यवस्थापनशास्त्र प्रशाळा, कबचौउमवि, जळगाव) |
| | | मोड्यूल तृतीय | : शिवराज बारी (गरूड महाविद्यालय, शेंदुर्णी) |
| **पदवी-पदव्युत्तर गट** | :- | पोस्टर प्रथम | : चेतन भावसार (एच.आर. पटेल इन्स्टीट्यूट ऑफ फार्मा,शिरपूर) |
| | | पोस्टर द्वितीय | : तन्मय भाले (जी.एच. रायसोनी इन्स्टिट्यूट, जळगाव) |

**(पान नं.४ वर)**

# राज्य मागासवर्ग आयोगाच्या सदस्यांनी घेतला आढावा

महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाच्या सदस्यांनी दि.१ नोव्हेंबर रोजी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठास भेट देऊन शिक्षक व शिक्षकेतर पदांचा आरक्षणाबाबत आढावा घेतला.

राज्य मागासवर्ग आयोगाचे सदस्य डॉ.गोविंद काळे, डॉ.गजानन खराटे, डॉ.नीलिमा सरप, ॲड बी.एल. किल्लारीकर या चार सदस्यांनी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहात बैठक घेतली. यावेळी कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी, उच्च शिक्षण जळगाव विभागाचे सहसंचाल डॉ.संतोष चव्हाण, कुलसचिव डॉ.विनोद पाटील, समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त योगेश पाटील, उपजिल्हाधिकारी, मागासवर्ग आयोगाचे कार्यालयीन अधिक्षक राजेश वाघ, उपकुलसचिव ए.सी.मनोरे, जी.एन.पवार, सहायक कुलसचिव देवेंद्र जगताप, एन.जी. पाटील, कक्ष अधिकारी जयश्री शिंगारे, डी.बी. बागले, सहसंचालक कार्यालयाचे अधिकारी राठोड आदी उपस्थित होते.



शैक्षणिक संस्थांमध्ये मागासवर्ग प्रवर्गाच्या आरक्षणाची अंमलबजावणी केली जात आहे की नाही, या प्रवर्गातील रिक्त पदे, विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीबद्दलच्या अडचणी या बाबतची विद्यापीठ व महाविद्यालयांमधील माहिती आयोगाच्या सदस्यांनी जाणून घेतली. प्रथमच या पध्दतीची आढावा बैठक घेतली जात असून वर्षातून एकदा अथवा दोनदा आयोगाकडून विधी मंडळाला याबाबतचा अहवाल दिला जात असतो. यामागे सामाजिक न्याय पाळला जातो की नाही ही भूमिका असल्याची माहिती ॲड. किल्लारीकर व डॉ.गोविंद काळे यांनी दिली. कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी विद्यापीठ व महाविद्यालयातील मंजूर व रिक्त पदे, त्यातील आरक्षण याबाबतची संविस्तर माहिती सदस्यांना दिली. कुलगुरु प्रा.माहेश्वरी यांनी देखील सदस्यांच्या शंकांचे निरसन केले. सदस्यांनी विद्यापीठ, सहसंचालक व समाजकल्याण विभागाला काही सूचना केल्या.

# नोव्होटा थर्मोटेक सोबत सामंजस्य करार

विद्यापीठ आणि नोव्होटा थर्मोटेक प्रा. लि.,मुंबई यांच्यात सोमवार दि. ३१ ऑक्टोबर रोजी कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या उपस्थितीत सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. थर्मली इन्सुलेटेड कोटींग संदर्भात हा करार करण्यात आला आहे.




नोव्होटा या कंपनीने त्यांच्या नवीन कार्यात्मक कोटींग विकासनासाठी विद्यापीठाच्या रसायन शास्त्र प्रशाळेकडे मार्गदर्शन आणि सहाय्य प्राप्त होण्यासाठी संपर्क साधला होता. थर्मल इन्सुलेटेड कोटींग संदर्भात व डेटा विकसित करण्यासाठी त्यांना या प्रशाळेकडून सल्ला दिला जाणार आहे. ही कंपनी कोटींग मध्ये अग्रेसर आहे. या सामंजस्य करारामुळे रसायनशास्त्र प्रशाळेतील विद्यार्थ्यांना देखील कोटींगच्या संदर्भात या कंपनीत प्रशिक्षण दिले जाणार आहे. या सामंजस्य करारावर विद्यापीठाकडून कुलसचिव डॉ. विनोद पाटील व कंपनीकडून व्यवस्थापकीय संचालक राजेंद्र चौधरी यांनी स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. एस.टी.इंगळे, प्रशाळेचे संचालक प्रा. डी.एच. मोरे, प्रा. पी.पी. माहुलीकर, प्रा. विकास गीते, प्रा.अमरदिप पाटील यांची उपस्थिती होती.

# बडोदा बँकेतर्फे दोन विद्यार्थी सन्मानित



विद्यापीठाच्या हिंदी विभागचे विद्यार्थी वैशाली भुरे व लखन वाघ यांना बँक ऑफ बडोदाच्या जळगाव क्षत्रिय कार्यालयाच्या वतीने गुणवंत विद्यार्थी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या कार्यालयाच्या वतीने दरवर्षी हिंदी विभागातून प्रथम व द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास रूपये ११ हजार आणि स्मृतीचिन्ह व रूपये ७ हजार ५०० व स्मृतीचिन्ह देवून सन्मानित केले जाते. प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे यांच्या हस्ते दि. १८ ऑक्टोबर रोजी या दोन्ही विद्यार्थ्यांना पुरस्कार देण्यात आले. यावेळी बडोदा येथील क्षेत्रीय राजभाषा अधिकारी सुकन्या देवी, डीजीटल बँकींगचे अधिकारी निखील वासनिक, गणित प्रशाळेचे संचालक प्रा. एस.आर. चौधरी, भाषा प्रशाळेच्या संचालक प्रा. मुक्ता महाजन हिंदी विभागप्रमुख प्रा. सुनील कुलकर्णी यांची उपस्थिती होती. प्रा. सुनील कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रिती सोनी व डॉ. पुरूषोत्तम पाटील यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

---

## आविष्कार संशोधन स्पर्धा उत्साहात

(पान नं. २ वरून)

### विज्ञान शाखा

| | | | |
|---|---|---|---|
| **पदवी गट** | :- | पोस्टर प्रथम | : संयुजा टाकळकर (मु.जे.महाविद्यालय, जळगाव) |
| | | मोड्युल द्वितीय | : नयनकुमार पाटील व गौरव चौधरी (झेड. बी. पाटील महाविद्यालय, धुळे) |
| | | पोस्टर तृतीय | : अचल बाधे व शुभांगी सावंत (बेंडाळे महिला महाविद्यालय, जळगाव) |
| **पदव्युत्तर गट** | :- | पोस्टर प्रथम | : प्रिया जैन व तेजस्वीनी खाचणे (रसायनशास्त्र प्रशाळा, कबचौउमवि,जळगाव) |
| | | मोड्युल द्वितीय | : जीवन पाटील (मु.जे. महाविद्यालय, जळगाव) |
| | | पोस्टर तृतीय | : अक्षदा कुलकर्णी व स्वाती पाटील (जी.टी. पाटील महाविद्यालय, नंदुरबार) |
| **पदवी-पदव्युत्तर गट** | :- | पोस्टर प्रथम | : हुसेन दाऊदी (संगणकशास्त्र प्रशाळा, कबचौउमवि) |
| | | पोस्टर द्वितीय | : आनंदसिंग पाटील (कला, वाणिज्य व विज्ञान महा., नवापूर) |

### अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञानशाखा

| | | | |
|---|---|---|---|
| **पदवी गट** | :- | पोस्टर प्रथम | : श्लोक सोनवणे व तेजस पाटील (आर.सी.पटेल इन्स्टि. ऑफ मॅनेजमेंट, शिरपूर) |
| | | पोस्टर द्वितीय | : रेणूका गोहिल व आदिती मारू (रासायनिक तंत्रज्ञान संस्था, कबचौउमवि) |
| | | मोड्युल तृतीय | : सूरज महाजन (संत मुक्ताबाई महाविद्यालय, मुक्ताईनगर) |
| **पदव्युत्तर गट** | :- | पोस्टर प्रथम | : झिया उलहक खान (रासायनिक तंत्रज्ञान संस्था, कबचौउमवि) |
| | | पोस्टर द्वितीय | : अभिषेक चौधरी व भूषण देसले (भौतिकीयशास्त्र प्रशाळा, कबचौउमवि) |
| | | मोड्युल तृतीय | : कांती चव्हाण (आर.सी.पटेल इन्स्टीट्यूट ऑफ फार्मा,शिरपूर) |
| **पदवी-पदव्युत्तर गट** | :- | पोस्टर प्रथम | : महेंद्र महाजन व प्रवीण पाटील (एच.आर. पटेल इन्स्टीट्यूट ऑफ फार्मा,शिरपूर) |
| | | पोस्टर द्वितीय | : प्रवीण पाटील (अभियांत्रिकी महाविद्यालय, बांभोरी) |

### औषधनिर्माण व वैद्यकीय शाखा

| | | | |
|---|---|---|---|
| **पदवी गट** | :- | पोस्टर प्रथम | : अनमोल दरत व दिशा दोशी (आर.सी. पटेल इन्स्टीट्यूट ऑफ फार्मा, शिरपूर) |
| | | पोस्टर द्वितीय | : वैष्णवी चोपडे व आदिती देहाडराय (आर.सी. पटेल इन्स्टीट्यूट ऑफ फार्मा, शिरपूर) |
| | | पोस्टर तृतीय | : युवंतिका पाटील (एच.आर. पटेल इन्स्टीट्यूट ऑफ फार्मा,शिरपूर) |
| **पदव्युत्तर गट** | :- | पोस्टर प्रथम | : अस्मा पठाण व भटू पाटील (आर.सी. पटेल इन्स्टीट्यूट ऑफ फार्मा, शिरपूर) |
| | | पोस्टर द्वितीय | : वैभव घोटेकर (आर.सी. पटेल इन्स्टीट्यूट ऑफ फार्मा, शिरपूर) |
| | | पोस्टर तृतीय | : साहिल सोनवणे (आर.सी. पटेल इन्स्टीट्यूट ऑफ फार्मा, शिरपूर) |
| **पदवी-पदव्युत्तर गट** | :- | पोस्टर प्रथम | : प्रिती बोबडे (आर.सी. पटेल इन्स्टीट्यूट ऑफ फार्मा, शिरपूर) |
| | | पोस्टर द्वितीय | : सोपान नागरे (एच.आर. पटेल इन्स्टीट्यूट ऑफ फार्मा,शिरपूर) |

### कृषी व पशुसंवर्धन शाखा

| | | | |
|---|---|---|---|
| **पदवी गट** | :- | पोस्टर प्रथम | : भावेश नारखेडे व योगेश्वरी वाघ (मु.जे.महाविद्यालय, जळगाव) |
| | | पोस्टर द्वितीय | : निकिता ठाकरे व रूचिता सुर्यवंशी (एच.आर.पटेल इन्स्टीट्यूट ऑफ फार्मा, शिरपूर) |
| | | पोस्टर तृतीय | : प्रथमेश फेगडे व विशाल येवले (धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर) |
| **पदव्युत्तर गट** | :- | पोस्टर प्रथम | : निरज पवार (आय.एम.आर.जळगाव) |
| | | मोड्युल द्वितीय | : श्रुती शर्मा व प्रफुल्ल पाटील (रासायनिक तंत्रज्ञान संस्था, कबचौउमवि) |
| | | पोस्टर तृतीय | : प्रज्ञा रणदिवे व वृषाली सुर्यवंशी (जैवशास्त्र प्रशाळा, कबचौउमवि) |
| **पदवी-पदव्युत्तर गट** | :- | पोस्टर प्रथम | : प्रियंका बऱ्हाटे (शिरीष मधुकरराव चौधरी महाविद्यालय, जळगाव) |
| | | पोस्टर द्वितीय | : वंदना चौधरी (जी.जी. खडसे महाविद्यालय, मुक्ताईनगर) |
| **शिक्षकेत्तर गट** | :- | प्रथम | : मोहिनीराज नेतकर (भौतिकीयशास्त्र प्रशाळा, कबचौउमवि) |
| | | द्वितीय | : हेमंत गायकवाड (बी.पी. कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,चाळीसगाव) |

# विद्यापीठात वाचन प्रेरणा महोत्सव उत्साहात

विद्यापीठाच्या विचारधारा प्रशाळे अंतर्गत सानेगुरुजी संस्कार केंद्र व ज्ञानस्रोत केंद्रातर्फे डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्ताने वाचन प्रेरणा महोत्सवाचे आयोजन १७ ते १९ ऑक्टोबर या कालावधीत करण्यात आले.

या महोत्सवाचे उद्घाटन कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांच्या हस्ते झाले. यावेळी माजी सिनेट सदस्य विष्णू भंगाळे, गोपालभाई चुधरा,



विचारधारा प्रशाळेचे प्रभारी संचालक प्रा.म.सु.पगारे, ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ.अनिल चिकाटे, गणपत माळी, राहुल निंबाळकर आदी यांची उपस्थिती होती. सामिया पठाण या विद्यार्थिनीने सूत्रसंचालन केले. तुकोबारायांच्या अभंगाने महोत्सवाला प्रारंभ झाला. वारीतील अनुभव, गमती जमती याचा अनुभव उपस्थित रसिकांना घेता आला. या सोबतच पंढरपूरच्या वारी विषयी मराठी माणसांच्या मनातील आस्था प्रभावीपणे कलावंतांनी पोहचविल्या. पालखीचे नाट्यरुपांतर शंभू पाटील यांनी केले असून दिग्दर्शन मंजुषा भिडे यांनी केले आहे. हर्षल पाटील, मंजुषा भिडे, होरीलसिंग राजपूत, अभिजीत पाटील, नेहा पवार या कलावंतांचा यात सहभाग होता. सुयोग गुरव, ऐश्वर्या परदेशी, वरुण नेवे यांनी या अभिवाचनातील अभंग सादर केले. मनीष गुरव व बुध्दभूषण मोरे यांनी वाद्यावर साथ दिली.



दि. १८ ऑक्टोबर रोजी कवी अरूण कोल्हटकर यांच्या 'भिजकी वही' या काव्यसंग्रहातील कवितांचे नाट्यात्मक सादरीकरण करून परिवर्तनच्या कलावंतांनी पूर्वापार चालत आलेल्या महिलांच्या वेदना प्रेक्षकांपर्यंत पोहचवल्या.

काळानुसार पुरक वेशभुषा, रंगभुषा, देखणे नेपत्थ्य, समर्पक प्रकाश योजना यामुळे हा प्रयोग अंतर्मुख करून गेला. यामध्ये जयश्री पाटील, हर्षदा कोल्हटकर, अंजली पाटील, प्रतिक्षा, सुदिप्ता सरकार, सोनाली पाटील, मंजूषा भिडे, नेहा पवार या कलावंतांनी कवितांचे सादरीकरण केले. शंभू पाटील यांनी कवितांचे निवेदन करून कविता सहज उलगडून दाखविली. या कार्यक्रमास वैशाली सुर्यवंशी, अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे, प्रा. म.सु. पगारे, डॉ. अनिल चिकाटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

शेवटच्या दिवशी दि. १९ ऑक्टोबर साने गुरूजींच्या साहित्यावर 'गोष्ट थोर माणसाची' चे सादरीकरण करण्यात आले. साने गुरुजींच्या साहित्यातील काही निवडक वेचे सादर करुन या कलावंतांनी साने गुरुजींचे ममत्व, माणुसपण प्रेक्षकांपर्यंत ताकदीने पोहचविले. यामध्ये हर्षल पाटील, ऐश्वर्या परदेशी, सुनिला बोलाने, पंकज पाटील, सोहम यांनी भाग घेतला. सुनीता दप्तरी यांनी संहिता लेखन केले. विनोद पाटील यांनी दिग्दर्शन केले. तांत्रिक सहाय्य राहुल निंबाळकर व बुध्दभूषण मोरे यांचे होते. वसंत गायकवाड व विशाल कुलकर्णी हे निर्मिती प्रमुख होते. यावेळी विचारधारा प्रशाळेचे प्रभारी संचालक प्रा. म.सु. पगारे, डॉ. अनिल चिकाटे, डॉ.विवेक काटदरे यांची प्रमख उपस्थिती होती.



# शिक्षणशास्त्र विभागातर्फे वाचन प्रेरणा दिन

विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विभागातर्फे डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्ताने वाचन प्रेरणा दिनानिमित्त व्याख्यान व निबंध स्पर्धेचे पारितोषिक वितरण करण्यात आले आहे.

विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विभागात १५ ऑक्टोबर रोजी विचारधारा प्रशाळेचे प्रभारी संचालक प्रा. म.सु.पगारे यांनी व्याख्यानात सांगितले की, आजचा विचार करता इंटरनेट व मोबाईलच्या वापरामुळे वाचन संस्कृती लयाला जाऊ पाहत आहे. माणसाने ज्ञान अर्जित करण्यासाठी वाचत राहिले पाहिजे. अध्यक्षस्थानी विभाग प्रमुख डॉ.मनिषा इंदाणी होत्या. याच कार्यक्रमात शिक्षक दिनानिमित्त घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेतील विजेते प्रथम क्रमांक नयना गवळे, समाजशास्त्र प्रशाळा, व्दितीय क्रमांक पठाण सामिया खानम जुबेर अहमद, व तृतीय क्रमांक धनश्री महाजन दोघेही संख्याशास्त्र प्रशाळा, उत्तेजनार्थ प्राजक्ता राजपूत भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्र व ट्विंकल वनकर, पर्यावरणशास्त्र व भूविज्ञान प्रशाळा यांना पारितोषिके वितरित करण्यात आली. प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ.रणजित पारधे यांनी करुन दिला. विद्यार्थी स्वप्नील पाटील, रुपाली पाटील, कांचन मिश्रा आणि मोनिका सोळंके यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन सविता अहीरराव तर आभार स्नेहा पवार यांनी मानले.

# सायबर सुरक्षेबाबत जनजागृती

सायबर क्राईम चे प्रमाण वाढले असल्याच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थी व विद्यार्थिनी मधील सजगता वाढावी यासाठी कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळेच्या विद्यार्थ्यांकडून विद्यापीठातील विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत जनजागृती करण्यात आली.



विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळा आणि क्विक हिल फाऊंडेशन यांच्यात झालेल्या सामंजस्य करारांतर्गत सायबर सुरक्षेबाबत जनजागृतीचे कार्यक्रम घेण्यात येत आहेत. दिनांक ९ नोव्हेंबर २०२२ रोजी एमबीएच्या च्या विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबद्दल माहिती देण्यात आली. संगणकशास्त्र प्रशाळेचे विद्यार्थी स्वयंसेवक जय पंडित व भावेश थोरात यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली.

संगणक शास्त्रप्रशाळेतील विद्यार्थी स्वयंसेवक धनराज बोंडे व मानसी बोरोले यांनी सायबर सुरक्षे बद्दल संगणकशास्त्र प्रशाळेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या दोन्ही सेशनमध्ये त्यांनी २७० विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या दोन्ही कार्यक्रमांना संगणक शास्त्र विभाग प्रमुख प्रा.मनीष जोशी, समन्वयक प्रा.राजू आमले, प्रा. सुरेंद्र कापसे व क्विक हिल फाउंडेशन, पुणे यांच्यातर्फे महेश भर्डी आदी उपस्थित होते.

तसेच विद्यापीठातील संगणकशास्त्र प्रशाळेच्या विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षेच्या बाबतीत विद्यार्थ्यांमध्ये जागरुकता निर्माण व्हावी यासाठी पथनाट्य सादर करण्यात आले.

गुरुवारी पदवी प्रदान सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्यावेळी प्रशाळेचे संचालक प्रा.सतीश कोल्हे, प्रा.अजय सुरवाडे, प्रा.रमेश सरदार, डॉ. राजीव आमले यांची उपस्थिती होती. विद्यापीठाने क्विक हेल फाऊंडेशन सोबत करार केला असून सायबर सुरक्षिततेबाबत सातत्याने जनजागृतीपर कार्यक्रम घेतले जातात.

# रासेयोने राबवले प्लास्टीक मुक्त अभियान

विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत १ ते ३१ ऑक्टोबर या कालावधीत प्लॉस्टीक मुक्त भारत हा उपक्रम ११४ महाविद्यालयात राबविण्यात येऊन १९ हजार ९२० किलो प्लास्टीक कचरा गोळा करण्यात आला.



भारत सरकारच्या युवा कार्य आणि क्रीडा मंत्रालय आणि रासेयो क्षेत्रिय संचालनालय, पुणे यांच्या सुचनेनुसार या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यापीठ अधिक्षेत्रातील ११४ महाविद्यालयांनी या उपक्रमात सहभाग घेतला. १६६०० रासेयो स्वयंसेवकांनी या अभियानात १९ हजार ९२० किलो प्लास्टीक कचरा गोळा करुन त्या त्या भागातील महानगरपालिका, नगरपालिका, ग्रामपंचायत यांच्या कडे देण्यात आला. हे प्लास्टीक विविध बसस्थानक, रेल्वेस्थानक, मंदिर परीसर, महाविद्यालय व विद्यापीठ परिसर, उद्यान, आदी सार्वजनिक स्थळांवरुन स्वयंसेवकांनी गोळा केला. हे अभियान राबवितांनाच स्वयंसेवकांनी गावाची स्वच्छता करुन नागरिकांमध्ये जागृती निर्माण केली. स्वच्छ भारत, सुंदर भारत, समृध्द भारत हा संदेश नागरिकांना दिला. काही ठिकाणी नागरिकांना या उपक्रमात सहभागी करुन घेत एकत्र काम करण्याचा व स्वच्छतेची धरु कास, देशाचा होईल विकास हा संदेश दिला. स्वच्छ भारत ठेवणे हीच महात्मा गांधीना खरी श्रध्दांजली ठरेल असाही संदेश गावकऱ्यांना स्वयंसेवकांनी दिला. या अभियानामुळे भविष्यात प्लॅस्टीकचा वापर कमी होईल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली अशी माहिती रासेयो विभागाचे संचालक डॉ.सचिन नांद्रे यांनी दिली.

**तसेच विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळेच्या वतीने विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने परीसर स्वच्छता उपक्रम घेण्यात आला.**

स्वच्छेतेचा सराव हा विषय विद्यार्थ्यांच्या पाठ्यक्रमाचा एक भाग आहे. या उपक्रमाच्यावेळी हिंदी विभाग प्रमुख प्रा. सुनील कुलकर्णी, मराठी विभाग प्रमुख प्रा. म.सु. पगारे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रशाळेच्या संचालक प्रा. मुक्ता महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशाळेचे विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. पुरुषोत्तम पाटील तसेच दीपक खरात, डॉ. सुदर्शन भवरे, डॉ. प्रिती सोनवणे, सुनील अहिरे, योगेश शिंदे, बाळासाहेब सुर्यवंशी, उज्वला लांडगे, तुषार सोनवणे, भरत पालोदकर, दीपक बागुल यांनी परीश्रम घेतले.

# बी.ए. मानसशास्त्र विषयात सुवर्णपदक

बी.ए. मानसशास्त्र विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास बापूसाहेब शहाजीराव त्र्यंबकराव साळुंखे यांच्या स्मरणार्थ सुवर्णपदक दिले जाणार असून या सुवर्णपदकासाठी प्रा.डी.पी.पवार व प्रतिभा पवार यांनी कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांच्याकडे दोन लाख रुपये निधीचा धनादेश सुपूर्द केला.




एन.मुक्टोचे माजी सरचिटणीस व माजी केंद्रीय उपाध्यक्ष प्रा.डी.पी.पवार यांनी त्यांचे सासरे बापूसाहेब शहाजीराव त्र्यंबकराव साळुंखे मु.पो.खेडगाव ता.चाळीसगाव यांच्या स्मरणार्थ हे सुवर्णपदक सुरु केले आहे. बी.ए. मानसशास्त्र विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस हे सुवर्णपदक दिले जाणार आहे. हा धनादेश कुलगुरुंकडे सुपूर्द करतांना सौ.प्रतिभा पवार, हेमंतकुमार साळुंखे, केतन पाटील, कुलसचिव डॉ.विनोद पाटील, वित्त व लेखा अधिकारी सीए रवींद्र पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक प्रा.दीपक दलाल, माजी अधिसभा सदस्य प्रा.अनिल पाटील, प्रा.एकनाथ नेहेते, प्रा.नितीन बावीस्कर हे उपस्थित होते.

# बी.टेक. अभ्यासक्रमात विषयात (स्पेशालायझेशन) मधून सुवर्णपदक




विद्यापीठातील बी.टेक. अभ्यासक्रमात सर्व स्पेशालायझेशन मधून सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यास 'कै. डॉ. दिनकर गोविंद चौधरी' यांच्या स्मरणार्थ सुवर्णपदक दिले जाणार असून या सुवर्णपदकासाठीचा दोन लाख रूपयांचा धनादेश प्राचार्य डॉ. गौरी राणे यांनी कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्याकडे नुकताच सुपूर्द केला.

श्रीमती मालिनी दिनकर चौधरी यांनी कै. डॉ. दिनकर गोविंद चौधरी यांच्या नावाने हे सुवर्णपदक प्रायोजित केले आहे. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक प्रा. दीपक दलाल, वित्त व लेखाधिकारी सीए रवींद्र पाटील, डॉ. शिल्पा बेंडाळे आदी उपस्थित होते.

# विद्यापीठ प्रशाळेतील विद्यार्थ्यांचे संशोधनाचे अविष्कार

लसुणाच्या अर्कापासून परिणामकारक किटकनाशक बनविणे यासारखा विषय असो अथवा वेदनाशामक औषधांची परिणामकारकता वाढविणे, हर्बल सिगारेटस अशा विविध विषयांवरील नवकल्पकता आणि संशोधनवृत्तीला चालना देणारे प्रकल्प विद्यापीठ प्रशाळेतील विद्यार्थ्यांच्या आविष्कार संशोधन स्पर्धेच्या निमित्ताने दिसून आले.



कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या प्रशाळेतील विद्यार्थ्यांची आविष्कार संशोधन स्पर्धा दि. २० ऑक्टोबर रोजी विद्यापीठात झाली. पदवीप्रदान सभागृहात सकाळी कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांच्या हस्ते स्पर्धेचे उदघाटन झाले यावेळी प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे, स्पर्धेचे समन्वयक प्रा.एस.आर.कोल्हे, प्रा.व्ही.व्ही.गिते, प्रा.सुनील कुलकर्णी, डॉ.व्ही.एम.रोकडे आदींची उपस्थिती होती.

१६९ प्रवेशिकेव्दारे २४४ विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन अंगी बाळगून विज्ञान, कृषी, पशुसंवर्धन, वाणिज्य व व्यवस्थापन, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, सामाजिकशास्त्र, फार्मसी आदी विषयांमधील पोस्टर व मोड्युल्सची मांडणी सभागृहात केली होती. पदवी, पदव्युत्तर, पदव्युत्तर पदवी व शिक्षक या गटातील स्पर्धक मोठया उत्साहाने आपले संशोधन सादर करीत होते. त्यांच्या या संशोधनात नाविन्यता तर होतीच मात्र भविष्यातील संशोधनाची बीजे देखील दिसून येत होती.

या स्पर्धेत इकोफ्रेन्डली किटकनाशके, व्हर्टीकल फार्मिंग, प्रदुषणावर उपाय, बॅक्टेरियांचा सुयोग्य वापर, पर्यावरण शिक्षण, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, गुडपार्क इन मायलिंग एरिया, संगणकाचा तंत्रज्ञानात वापर, नैसर्गिक द्रव्यांपासून पॉलिमर रेझिन, सायबर सुरक्षितता, शेतीतील कचऱ्यापासून इंधननिर्मीती, आधुनिक शेती, बायो इथॉनॉल, आधार मतदान कार्डाशी जोडणीची परिणामकारता, आपले सरकार, आत्महत्या, लहान राज्याची मागणी, बेरोजगारी, रशिया युक्रेन युध्द, दारिद्रता, अविकसनशील भारत, मोबाईलचा वापर, लैगिक शिक्षण, महाराष्ट्रातील लोककला, प्लाझ्मा, थर्मल प्रोसेस, सोलर सेल, प्लास्टीक कचऱ्यापासून इंधन निर्मिती, वॉटरबेस पेन्ट, ॲक्रेलिक पेन्ट, गोमुत्राचे उपयोग आदी विषयांवर पोस्टर व मॉड्युल्स विद्यार्थ्यांकडून सादर करण्यात आले.



# खान्देशस्तरीय सुगम गायन स्पर्धा उत्साहात

विद्यापीठाच्या संगीत विभागातर्फे झालेल्या खान्देशस्तरीय सुगम गायन स्पर्धेत श्रुती जोशी हिने प्रथम तर प्रगती तांबटने द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले.




कला व मानव्य विज्ञान प्रशाळेअंतर्गत असलेल्या संगीत विभागाकडून यावर्षी प्रथमच खान्देशस्तरीय सुगम गायन स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेला चांगला प्रतिसाद मिळाला. पाचहजार रूपये व स्मृती चिन्ह असे स्वरूप असलेले प्रथम क्रमांकाचे पारितोषिक श्रुती जोशीला मिळाले. चार हजार रूपयांचे द्वितीय पारितोषिक प्रगती तांबट आणि तीन हजार रूपयांचे तृतीय पारितोषिक अंजली मोहरीरला मिळाले. एकहजार रूपयांचे तीन उत्तेजनार्थ पारितोषिके ठेवण्यात आली होती. हे उत्तेजनार्थ पारितोषिक अथर्व मुंडले, जयेश महाजन आणि स्वरमयी देशमुख यांना प्राप्त झाले.

कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. यावेळी बोलतांना प्रा. माहेश्वरी यांनी संगीत हा आपल्या संस्कृतीचा अविभाज्य भाग असून तंत्रज्ञान जोड देवून संगीताला घराघरात पोहचविण्याचे प्रयत्न केले जावेत अशी अपेक्षा व्यक्त केली. दरवर्षी ही स्पर्धा घेतली जाईल असेही कुलगुरूंनी सांगितले. यावेळी ज्ञानेश्वर कासार यांनी परीक्षकांच्या वतीने मनोगत व्यक्त केले. यावेळी प्रशाळेचे प्रभारी संचालक डॉ. अनिल चिकाटे व परिक्षक पुष्कराज भागवत यांची उपस्थिती होती. प्रा. अलका चव्हाण यांनी आभार मानले सकाळी प्र-कुलगुरू प्रा.एस.टी.इंगळे यांनी स्पर्धेचे उद्‌घाटन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रिया महाले यांनी केले. तेजस मराठे व संगीत विभागाचे यांनी स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी परीश्रम घेतले.

# विद्यापीठात एकता दौड

विद्यापीठात सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती दिनी राष्ट्रीय एकता दिवसानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने. रन फॉर युनीटी अंतर्गत एकता दौड काढण्यात आली. तसेच स्वच्छ भारत अभियान व प्लास्टिक मुक्ती अभियानाअंतर्गत १० किलो प्लास्टीक संकलित करण्यात आले.




प्रशासकीय इमारतीत सरदार वल्लभभाई पटेल तसेच माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांनी पुष्पहार अर्पण केला. यावेळी राष्ट्रीय एकता दिनाची शपथ जनसंपर्क अधिकारी डॉ. सुनील पाटील यांनी दिली. रा.से.यो. विभाग व समाजकार्य विभागातील रा.से.यो. यांच्या संयुक्त विद्यमाने काढण्यात आलेल्या एकता दौडीस कुलगुरू प्रा. माहेश्वरी यांनी हिरवी झेंडी दिली. यामध्ये ६० स्वयंसेवक सहभागी होते. प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, , वित्त व लेखाधिकारी सीए रवींद्र पाटील, रा.से.यो. संचालक डॉ. सचिन नांद्रे उपस्थित होते. या रा.से.यो. स्वयंसेवकांनी विद्यापीठ परीसरात १० किलो प्लास्टिक संकलित करून महापालिकेच्या आरोग्य विभागाकडे सुपूर्द केले या अभियाना प्रसंगी रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. मनोज इंगोले, डॉ. कविता पाटील, सहायक कार्यक्रम अधिकारी शरद पाटील, कक्ष अधिकारी कैलास औटी, शिवाजी पाटील यांनी परिश्रम घेतले.

# आंतरविभागीय क्रीडा स्पर्धा

विद्यापीठाच्या क्रीडा संकुलामध्ये आंतरविभागीय कबड्डी आणि व्हॉलीबॉल (पुरुष / महिला) स्पर्धेचे उद्‌घाटन कुलगुरु प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या हस्ते झाले.





यावेळी प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे, जळगाव विभाग क्रीडा समितीचे सचिव डॉ.श्रीकृष्ण बेलोरकर उपस्थित होते. या स्पर्धेत जळगाव, धुळे, नंदुरबार आणि एरंडोल विभागाच्या एकूण १९२ महिला व पुरुष खेळाडूंनी सहभाग घेतला आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.दिनेश पाटील यांनी केले. सूत्रसंचालन डॉ.पी.आर.चौधरी यांनी केले.

# देशभक्तीपर गायन स्पर्धा

विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग आणि भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्राच्यावतीने घेण्यात आलेल्या देशभक्तीपर गीत गायन स्पर्धेत विद्यापीठाच्या संगीत विभागाची विद्यार्थिनी अंजली मोरे हिने प्रथम क्रमांक प्राप्त केला.

देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत जामनेर महाविद्यालयाचा याने व्दितीय तर भौतिकशास्त्र प्रशाळेची दर्शना साठे हिने तृतीय क्रमांक प्राप्त केला. व्यवस्थापन परिषदेचे माजी सदस्य दिलीप पाटील यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. यावेळी प्रा.संजय पत्की, प्रभारी संचालक प्रा.सुनील कुलकर्णी, प्रशाळेच्या संचालक प्रा.मुक्ता महाजन यांची प्रमुख उपस्थिती होती. देशभक्तीचा भाव हा जसा गीत आणि संगीतातून व्यक्त होतो तसा देशाच्या प्रगती व विकासासाठी आपण आपल्या प्रयत्नातून करायला हवा. देशभक्ती केवळ स्पर्धेपुरती मर्यादित नको असे दिलीप पाटील म्हणाले. प्रा.मुक्ता महाजन यांनी संगीतातील सूर आणि समाजातील असूर याचा फरक सांगितला. अलका चव्हाण व प्रिया महाले यांनी परीक्षक म्हणून काम केले. डॉ.पुरुषोत्तम पाटील यांनी सूत्रसंचालन केले. योगेश शिंदे यांनी आभार मानले.




# स्वातंत्र्य लढयात खान्देशातील आदिवासींचे योगदान

खान्देशातील क्रांतीकारकांचे भारतीय स्वातंत्र्य लढयातील योगदान अंबापाणी येथील युध्द, चिमठाणा येथील आदिवासींचा लढा या व अशा काही उदाहरणावरुन दिसून येते असे प्रतिप्रादन प्राचार्य डॉ. बी.एन. पाटील यांनी केले.

विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्र आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त डॉ. पाटील यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रा. पाटील यांनी सांगितले की, प्रारंभीच्या काळात भिल्ल जमातीतील क्रांतीकारक गुमानसिंग नाईक, काझीसिंग नाईक यांनी सरंजामशाही विरूध्द लढत स्वातंत्र्याची मशाल पुढे नेली. अंबापाणीच्या लढयात खान्देशातील महिलांनी क्रांतीकारकांना भाकरी पुरूवून योगदान दिले. जल, जंगल आणि जमीन यावर कोणालाही ताबा मिळवू देणार नाही या भूमिकेतून क्रांतीकारक लढले. चहार्डी खजीना लूट, चिमठाणा खजीना लूट या संबंधीत त्यांनी विवेचन केले.

प्रा. एस.टी. इंगळे म्हणाले की, भारतीय स्वातंत्र्याचा लढा हा आपलया सगळ्यांसाठी अस्मितेचा भाग आहे. खान्देशातील क्रांतीकारकांचे योगदान नव्या पिढीने समजून घेतले पाहिजे. प्रशाळाच्या संचालक प्रा. मुक्ता महाजन यांनी नव्या पिढीला मागचा इतिहास समजावा म्हणून असे क्रायर्कम घेत असल्याचे सांगितले. अध्यक्षीय समारोप डॉ. ए.पी. पाटील यांनी केला. कार्यक्रमाच सूत्रसंचालन सुनील अहिरे यांनी केले.

# विद्यार्थी विकास विभागातर्फे सहविचार कार्यशाळा

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठीचे मोजकेपण नावीन्यपूर्ण उपक्रम विद्यार्थी विकास विभागामार्फत विद्यापीठ आणि महाविद्यालयांमध्ये राबविले जावेत अशी अपेक्षा कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी व्यक्त केली.





मंगळवार दि. १५ नोव्हेंबर रोजी प्राचार्य, संचालक, जिल्हा विद्यार्थी विकास समन्वयक आणि विद्यार्थी विकास अधिकारी यांची समन्वय व सहविचार कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेचे उद्घाटन करतांना कुलगुरू प्रा. माहेश्वरी बोलत होते. यावेळी मंचावर विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक प्रा. सुनील कुलकर्णी, वित्त व लेखाधिकारी सीए रवींद्र पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक प्रा. दीपक दलाल उपस्थित होते.

कुलगुरू आपल्या भाषणात पुढे म्हणाले की, आपल्या विद्यापीठाचा विद्यार्थी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत उतरेल असा तयार करण्याचे उद्दीष्ट सर्वांना डोळ्यासमोर ठेवायला हवे. त्यासाठी विद्यार्थ्याच्या व्यक्तीमत्वाचे पैलू पडावेत म्हणून अभ्यासाव्यतिरिक्त इतर उपक्रम राबविणे गरजेचे आहे. हे उपक्रम विद्यार्थी विकास विभागामार्फत राबविण्यासाठी सात कोटी रूपयांची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे. विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरतील असे नाविन्यपूर्ण उपक्रम यामधून राबविले जावेत अशी अपेक्षा त्यांनी बोलून दाखविली. प्रारंभी प्रा. सुनील कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. उद्घाटनानंतर अर्थसंकल्पीय तरतूद आणि खर्च यावर सीए रवींद्र पाटील, प्रश्नसंच निर्मिती आणि ऑनस्क्रिन परीक्षा मूल्यांकन यावर प्रा. दीपक दलाल यांनी मार्गदर्शन केले.

दुपारच्या सत्रात लेखा परीक्षणांच्या अडचणींबाबत उपवित्त व लेखाधिकारी एस.आर. गोहिल, सनदी लेखापरीक्षक सीए ए.आय. कोठारी यांनी मार्गदर्शन केले. प्रा. सुनील कुलकर्णी यांनी विद्यार्थी विकास विभागाच्या उपक्रमांचा आढावा घेतला. सायंकाळी प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे व कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांच्या उपस्थितीत कार्यशाळेचा समारोप झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पुरूषोत्तम पाटील यांनी केले, वसंत वळवी यांनी आभार मानले.

# जे.बी. प्लास्टोकेम सोबत करार

विद्यापीठ आणि जे.बी. प्लास्टोकेम प्रा. लि., जळगाव यांच्यात पी.व्ही.सी. साठी हिट स्टॅबिलायझर्स तयार करण्याकामी मार्गदर्शन करण्यासाठी करारपत्र करण्यात आले असून कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या उपस्थितीत स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.




जे.बी. प्लास्टोकेम प्रा.लि.मि., जळगाव शहरातील स्टेबिलायझर्स तयार करणारी नामांकित कंपनी आहे. या करारानुसार विद्यापीठाच्या रासायनिक शास्त्र प्रशाळेच्या वतीने पी.व्ही.सी. साठी हिट स्टॅबिलायझर्स तयार करण्यासाठीचे व पृथ:करण करण्यासाठी मार्गदर्शन केले जाणार आहे. भविष्यात या प्रशाळेच्या विद्यार्थ्यांना या कंपनीत इंटर्नशिपसाठी देखील पाठविले जाणार आहे.

या कराराप्रसंगी प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, कंपनीचे संचालक व व्यवस्थापक अविनाश जैन, अन्य संचालक कैलास खैरनार तसेच प्रा. विकास गीते, प्रा. अमरदीप पाटील उपस्थित होते.

# सहजीवनात संवाद महत्वाचा - डॉ. रवींद्र



दैनंदिन जीवनात जगत असतांना स्त्री-पुरुष व पती पत्नी यांच्यातील संवाद व परस्परांतील ताळमेळ व्यवस्थित असेल तर तुमचे जीवन सुकर होईल असे मत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार सेवा विभागाच्यावतीने आयोजित ऑनलाईन व्याख्यानमालेत एकविसाव्या शतकात स्त्री-पुरुष सहजीवन या विषयावर बोलतांना वक्ते रवींद्र पंढरीनाथ यांनी व्यक्त केले.

खान्देशकन्या कवयित्री बहिणाबाई चौधरी व्याख्यानमालेत रवींद्र पंढरीनाथ यांच्या ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन दि.३१ ऑक्टोबर रोजी करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, एकत्र कुटुंबपध्दती संपुष्टात येत असल्याने व थोडया फार प्रमाणात सोशल मिडीयामुळे एकमेकांतील संवाद संपत चालला आहे. स्त्री-पुरुष परस्परांचे शत्रू नसून ते दोघे एकत्र आल्याशिवाय जीवन सुकर होवूच शकत नाही. प्रेमविवाह करण्याचे प्रमाण पूर्वी ४ टक्के होते आता ते प्रमाण २०टक्क्यापर्यंत गेल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी विद्यापीठाच्या व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेच्या संचालक प्रा.मधुलिका सोनवणे हया अध्यक्षस्थानी होत्या. प्रा.सोनवणे म्हणाल्या की, कुटुंब स्थिर ठेवायचे असेत व प्रगती करायची असेल तर परस्परातील संवाद गरजेचा आहे. प्रास्ताविक विभागाचे संचालक प्रा.आशुतोष पाटील यांनी केले. पाहुण्यांचा परिचय वर्षा परदेशी हिने तर सूत्रसंचालन जितेंद्र राठोड याने केले. आभार यश पानपाटील यानी मानले.

# भाषा अभ्यास प्रशाळेतर्फे निबंध स्पर्धा

विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळा आणि संशोधन केंद्रातर्फे घेण्यात आलेल्या निबंध लेखन स्पर्धेत समाजकार्य विभागाचा विद्यार्थी जितेंद्र क्षीरसागर याने प्रथम क्रमांक प्राप्त केला.

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षा निमित्त ही निबंध लेखन स्पर्धा घेण्यात आली. रसायन शास्त्र प्रशाळेचा धवल सुर्यवंशी याने द्वितीय क्रमांक प्राप्त केला तर नाहाटा महाविद्यालय, भुसावळची सायली महाजन आणि संख्याशास्त्र प्रशाळेच्या सामिया पठाण या दोघींना तृतीय पारितोषिक विभागून देण्यात आले. डॉ. मनिषा इंदाणी डॉ. लिलाधर पाटील यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. २८ विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला अशी माहिती प्रशाळेच्या संचालक प्रा. मुक्ता महाजन यांनी दिली. डॉ. प्रिती सोनी आणि बाळासाहेब सुर्यवंशी यांनी स्पर्धेचे नियोजन केले.

# काव्यवाचन स्पर्धा

विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग आणि भाषा अभ्यास प्रशाळा आणि संशोधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या काव्य वाचन स्पर्धेत धुळे येथील विद्यावर्धिनी महाविद्यालयाचा विद्यार्थी रोहित ठाकूर याने प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त ही स्पर्धा घेण्यात आली. प्रभारी संचालक प्रा. सुनील कुलकर्णी यांच्याहस्ते उद्‌घाटन झाले. प्रा.मुक्ता महाजन अध्यक्षस्थानी होत्या. या स्पर्धेत गणितशास्त्र प्रशाळेतील सामिया पठाण व भावेश पाटील या विद्यार्थ्यांनी व्दितीय व तृतीय क्रमांक प्राप्त केला. शशिकांत हिंगोणेकर व डॉ.अस्मिता गुरव यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. आजीवन अध्ययन व विस्तार सेवा विभागाचे संचालक प्रा.आशुतोष पाटील यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.उज्वला लांडगे यांनी केले.

# 'उत्साह संवाद' विषयावर कार्यशाळा

विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाव्दारे उत्साही संवाद या विषयावर विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा संपन्न झाली.

दि.२१ ऑक्टोबर रोजी व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेत झालेल्या या कार्यशाळेत महेश वागळे यांनी उत्साही संवाद कसा करावा, संवाद साधतांना आपले विचार, भावना, कल्पना एकमेकांसोबत कसे मांडावे आदी बाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी प्रशाळेच्या संचालक प्रा.मधुलिका सोनवणे हया अध्यक्षस्थानी होत्या. प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा.रमेश सरदार यांनी केले. विद्यापीठाने वालचंद पीपल्स फर्स्ट लिमिटेड सोबत केलेल्या करारांतर्गत या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत ९८ विद्यार्थी उपस्थित होते.

# जागतिक अन्नदिवस साजरा

विद्यापीठाच्या रसायन तंत्रज्ञान संस्थेच्या अन्न तंत्रज्ञान विभागात जागतिक अन्न दिवस साजरा करण्यात आला. अन्नासंबंधी जागरूकता, अन्नाचे जतन व संशोधन आणि संवर्धन या विषयी मार्गदर्शन करण्यात आले. संचालक प्रा. जे.बी. नाईक, विभागप्रमुख डॉ. व्ही.आर. पराते, प्रा. जी.ए. उस्मानी, प्रा.शिरसाम, डॉ. बाथे, डॉ. तालीब,प्रा. मांडे आदी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

# प्राचार्य, अध्यापक, विद्यापीठ अध्यापक अधिसभेची तात्पुरती मतदार यादी प्रसिध्द

विद्यापीठाच्या अधिसभेवर निवडून द्यावयाच्या सदस्यांसाठी प्राचार्य, अध्यापक, विद्यापीठ अध्यापक गटाची तसेच विद्यापरिषदेवर व अभ्यासमंडळावर निवडून द्यावयाच्या सदस्यांसाठी अध्यापक व विभागप्रमुखांची तातुरती निर्वाचक गणाची यादी (तात्पुरती मतदार यादी) विद्यापीठाने दि. १५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी प्रसिध्द केली असून याबाबतीत काही दुरूस्ती, आक्षेप/हरकती असतील तर ते नोंदविण्यासाठी २१ नोव्हेंबर पर्यंतची मुदत देण्यात आली आहे.

विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांची निवडणूक प्रक्रिया सुरु झाली आहे. प्राचार्यांमधून अधिसभेवर १०, संलग्नित महाविद्यालये व परिसंस्थामधील अध्यापकांच्या गटांमधून अधिसभेवर १० आणि विद्यापीठ अध्यापकांच्या गटांमधून ०३ सदस्य निवडून द्यावयाचे आहे. याशिवाय संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्या विभागप्रमुखांच्या गटामधून अभ्यासमंडळावर ०३ विभागप्रमुख निवडून द्यावयाचे आहेत. तर विद्यापीठ अध्यापक गटांमधून तसेच महाविद्यालये व परिसंस्थांच्या अध्यापक गटामधून प्रत्येक विद्याशाखेनिहाय प्रत्येकी ०२ सदस्य विद्यापरिषदेवर निवडून द्यावयाचे आहेत. या बाबतीत निर्वाचक गण तयार करण्यासाठी विद्यापीठाकडून यापूर्वीच अधिसूचना जारी करण्यात आली होती.

या अनुषंगाने विद्यापीठाने तात्पुरती निर्वाचक गणांची यादी (तात्पुरती मतदार यादी) मंगळवार दि. १५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर तसेच विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीमधील नोटीस बोर्डावर प्रसिध्द केली आहे. संबंधितांनी या यादीचे अवलोकन करून आपल्या नावासमोर काही दुरुस्ती /बदल किंवा काही हरकत /आक्षेप असल्यास त्यासंदर्भात आपला लेखी अर्ज आवश्यक त्या पूरक कागदपत्रांसह दि. २१ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ०५ वाजेपर्यंत विद्यापीठाच्या निवडणूक शाखेत (कक्ष क्रमांक ४१०) प्रत्यक्ष सादर करावा. विहित तारीख वेळेनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी असे कुलसचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. विनोद पाटील यांनी कळविले आहे.

# पदवी प्रमाणपत्रासाठी विलंब शुल्कासह मुदतवाढ

विद्यापीठाच्या ३१ व्या दीक्षांत समारंभात ज्या विद्यार्थ्यांना पदवी/पदवीका प्रमाणपत्र घ्यावयाचे आहेत त्यांनी विलंब शूल्कासह दि. १६ नोव्हेंबर ते २१ नोव्हेंबर, २०२२ पर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करावयाचे आहेत.

विद्यापीठातर्फे ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२१ आणि एप्रिल/मे-२०२२ व त्यापूर्वी घेण्यात आलेल्या परीक्षांमध्ये जे विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत अशा सर्व विद्यार्थ्यांसाठी आणि पीएच.डी. धारकांकरिता ऑनलाईन पदवी / पदविका प्रमाणपत्र अर्ज विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर Home Page वरील Student Corner-> Examination-> Convocation वर उपलब्ध आहे. विलंब शुल्कासह अर्ज भरण्याची मुदत दि.१६ नोव्हेंबर ते २१ नोव्हेंबर, २०२२ पर्यंत आहे. उत्तीर्ण वर्षापासून पाचवर्षाच्या आत पदवीप्रमाणपत्र शुल्क रूपये ३५०/- असून उत्तीर्ण वर्षापासून पाच वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला असल्यास रूपये १०००/- भरावे लागतील तसेच विलंब शूल्क रूपये १००/- आहे. पदवीप्रमाणपत्राचे शुल्क क्रेडिट कार्ड/डेबीट कार्ड/ नेट बँकिग द्वारे ऑनलाईन भरावे असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन विभागाचे प्रभारी संचालक डॉ.दीपक दलाल यांनी केले आहे.

# 'मुलाखत कौशल्य' विषयावर कार्यशाळा



विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाव्दारे मुलाखत कौशल्य या विषयावर प्रा. राहूल त्रिवेदी यांची विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा घेण्यात आली. दि.१४ नोव्हेंबर रोजी विद्यापीठातंर्गत प्रशाळेच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी झालेल्या या कार्यशाळेत राहूल त्रिवेदी, जळगाव यांनी मुलाखत कौशल्य या विषयावर संवाद साधला, मुलाखतीचे कौशल्य आणि तंत्र यातील फरक स्पष्ट करतांना त्यांनी विविध उदाहरणे दिली. यावेळी केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाचे समन्वयक प्रा. रमेश सरदार अध्यक्षस्थानी होते. प्रास्ताविक व सूत्रसंचालन अमेय भट्टाचार्य याने केले, देवदत्त बॅनर्जी याने आभार मानले. या कार्यशाळेत ३६२ विद्यार्थी उपस्थित होते.

# ‘इंद्रधनुष्य’ युवक महोत्सवात विद्यापीठाला ४ पदके

राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठात झालेल्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठीय इंद्रधनुष्य युवक महोत्सवात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला एक सुवर्ण, एक रौप्य व दोन कास्य पदक असे एकूण चार पदके प्राप्त झाली आहेत.








राहुरी येथे झालेल्या इंद्रधनुष्य युवक महोत्सवात अकृषी, कृषी, आरोग्य, विज्ञान तंत्रज्ञान आणि मुक्त विद्यापीठ अशा एकूण २१ विद्यापीठांनी सहभाग घेतला होता. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला प्रथमच एवढया मोठ्या प्रमाणात यश मिळाले आहे.

वादविवाद साहित्य प्रकारात चंचल धांडे (मु.जे. महाविद्यालय, जळगाव) व सारांश सोनार (सामाजिक शास्त्र प्रशाळा, कबचौ उमवि) यांच्या संघाला सुवर्णपदक प्राप्त झाले. संगीतामधील तालवाद्य एकल या कला प्रकारात यज्ञेश माळी (मु.जे. महाविद्यालय, जळगाव) याला रौप्य तर ललित कलामधील माती कला या प्रकारात देवा सपकाळे (मु.जे. महाविद्यालय, जळगाव) आणि स्थळ छायाचित्रण कला प्रकारात चैतन्य कोळी (प्रताप महाविद्यालय, अमळनेर) या दोघांना कास्य पदक प्राप्त झाले. विद्यापीठाचे विविध कला प्रकारात ३१ विद्यार्थी आणि ७ साथीदार असे एकूण ३८ जण सहभागी झाले होते. तर संघासोबत व्यवस्थापक म्हणून प्रा. विजय लोहार (मु.जे. महाविद्यालय, जळगाव) व महिला संघ व्यवस्थापक म्हणून डॉ. रूपाली चौधरी (बेंडाळे महिला महाविद्यालय, जळगाव) यांचा सहभाग होता. याशिवाय नृत्यदिग्दर्शक प्रा. अजय शिंदे, संगीत प्रशिक्षक कपील शिंगाणे, देवेंद्र गुरूव, कुलदिप भालेराव, प्रसाद कासार, भाग्यश्री पाटील, तेजस मराठे आणि मधुरा इंगळे यांचा सहभाग होता. पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांचे कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. सुनील कुलकर्णी यांनी अभिनंदन केले.

संघ महोत्सवाला पाठविण्यापूर्वी या विद्यार्थ्यांना राजू बावीस्कर, डॉ. आशुतोष पाटील, अपर्णा भट, नाना सोनवणे, आणि पियुष बडगुजर यांनी प्रशिक्षण दिले होते.

## आगामी कार्यक्रम

दि. १९ नोव्हेंबर : इंदिरा गांधी जयंती व राष्ट्रीय एकात्मता दिन
दि. २१ ते २६ नोव्हेंबर: अध्यापक विकास या कार्यक्रमाचे आयोजन
दि. २६ नोव्हेंबर : संविधान दिवस
दि. ३ डिसेंबर : कवयित्री बहिणाबाई चौधरी पुण्यतिथी
: विद्यापरिषदेची सभा
दि. ६ डिसेंबर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन
दि. ८ डिसेंबर : संत जनागडे महाराज जयंती
(भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करणे)

मार्गदर्शक: प्रा. व्ही.एल. माहेश्वरी, कुलगुरू निर्मिती: जनसंपर्क विभाग, कबचौ उमवि, जळगाव
ई-उत्तमविद्या हे कबचौ उमवि, जळगावचे गृहपत्र खाजगी वितरणासाठी कुलसचिव, कबचौ उमवि यांनी प्रकाशित केले.